"महाराष्ट्रातील कृषी बाजारपेठेअंतर्गत फळे व भाजीपाला बाजारपेठांचा अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा (२०१४-१५ ते २०२४-२५)"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत वाणिज्य विषयातील पीएच. डी. पदवीसाठीच्या शोध प्रबंधाचा प्रारुप आराखडा

संशोधक

नम्रता संजय वाघमारे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पी.टी. पवार

वाणिज्य विभाग,

शिवाजी महाविद्यालय,

रेणापूर, ता. रेणापूर, जि. लातूर (महाराष्ट्र)

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय,

रेणापूर, ता. रेणापूर, जि. लातूर

ऑगस्ट २०२३

"महाराष्ट्रातील कृषी बाजारपेठेअंतर्गत फळे व भाजीपाला बाजापेठांचा अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा (२०१४-१५ ते २०२४-२५)"

१. प्रास्तावना :

शेती सर्वात जुना व प्राचीन व्यवसाय आहे. प्राथमिक शेती व्यवसाय हा अंदाजे ख्रिस्तपूर्व ५००० वर्षापूर्वी इजिप्त व बॅबीलोन येथे केला जात होता. प्राचीन काळी मानवी संस्कृतीचा उगम नदीकाठीच झालेला आढळून येतो. नाईल व सिंधू या नद्यांनी मानवी संस्कृतीला जन्म दिला आणि आज ही विज्ञानाच्या युगात मानवी संस्कृतीचा विकास शेतीवरच अवलंबून असल्याचे दिसून येते. पुर्वी मानव रानटी अवस्थेत जीवन जगत असताना जंगलातील कंदमुळे, फळे व मांस खाऊन स्वतःचा उदरनिर्वाह करीत असे. हीच फळे व मांस भाजून खाल्ल्यास, भाजी व काही कच्चे फळे खाल्ली तर जेवणात गोडी निर्माण होते.

कृषी हा शब्द कृष (नांगरणे) या शब्दापासून तयार झाला आहे. केवळ शेतजमीन नांगरुन पिके काढणे एवढ्यापुरता कृषीचा अर्थ मर्यादित नाही तर अन्न, वस्त्र, गाय, बैल, म्हैस, बकऱ्या, मेंढया, कोंबडया, मधमाशा पाळणे, रेशमाची किडे पाळणे, फळे व भाजीपाला पिकविणे असा व्यापक अर्थ कृषीचा घेतला जातो. कृषीमध्ये साधारणपणे जिराईत व बागाईत अशी दोन प्रकारची पिके घेतली जातात. पावसाळ्याच्या सुरुवातीस जी पिके घेतली जातात त्यास खरीप पिके तर हिवाळ्यात पेरणी करुन जी पिके घेतली जातात त्यास रब्बी पिके असे म्हणतात.

आजही मानव आपल्या अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी शेतीवर अवलंबून आहे. अलीकडील काळात औद्योगीकीकरणात मोठया प्रमाणात वाढ झाली असली तरी आजही शेती व्यवसाय हा सर्वात महत्वाचा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. २/३ लोकाचे जीवनमान शेती व्यवसायावर अवलंबून आहे. शेतीमधून अन्नधान्य, ऊस, कापूस, तेलबिया, मसाल्याचे

पदार्थ, फुले, फळे, भाजीपाला अशी पिके घेतली जातात. अन्नधान्याचा पुरवठा शेतीवरच अवलंबून असतो. शेतीविकास घडवून आणण्यासाठी जगातील विविध देश प्रयत्नशील आहेत. जागतिक बाजारपेठेत शेती व्यवसायाने मोठे योगदान दिले आहे. युरोपीय देशात शेती शास्त्रीय पध्दतीने केली जाते. त्यामूळे तेथील लोकांचे उत्पादन वाढून जीवनमान बदललेले दिसते. मात्र भारतात अजूनही शास्त्रशुध्द पध्दतीने शेती केली जात नाही. परिणामी लोकांचे जीवनमान सुधारलेले दिसत नाही.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा मुलाधार शेती आहे. महाराष्ट्राच्या शेतीमधून गहु, ज्वारी, बाजरी, तांदूळ या खाद्यान्ना बरोबरच ऊस, कापूस, भाजीपाला, फळे ही पिके शेतीमध्ये घेतली जातात. नाशिकची द्राक्षे, जळगावची केळी, नागपूरची संत्री, कोकणचा आंबा, पश्चिम महाराष्ट्राचा ऊस, विदर्भ व मराठवाडयाचा कापूस त्याचप्रमाणे लातूर जिल्हयाने देखील आंबा, द्राक्ष, डाळींब, केळी, पालेभाज्या इत्यादी शेती उत्पादनात भरीव कामगिरी केली आहे. 'अमराई' या ब्रॅण्डने उत्तम दर्जाचे पॅकिंग बॉक्स तयार करुन शेतकऱ्यांना मोठया प्रमाणावर परकीय चलन मिळवून दिले आहे.

आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांनी पिकविलेल्या शेतमालाला योग्य किंमत मिळणे आवश्यक आहे. शेतमालाचे उत्पादन करणारे शेतकरी व शेतमालाची खरेदी करणारे व्यापारी यांना एकत्रित आणण्याचे काम कृषीबाजारपेठा करतात. शेतमाल विक्री व्यवस्था म्हणजे शेतमालबाजारात आणून केली जाणारी विक्री नव्हे तर शेतातील पिकांची कापणी शेतमाल विक्रीव्यवस्था यांत्रिकी असावी असे म्हटले जाते. त्यादृष्टीने शेतमाल विक्रीव्यवस्था शेतमालाला योग्य किंमत मिळवून देणारी असावी. त्या विक्रीव्यवस्थेला चांगली विक्रीव्यवस्था म्हणतात. शेतकरी व शेतीविकासाच्या दृष्टीने शेतमाल विक्रीव्यवस्था चांगली किंवा आदर्श विक्रीव्यवस्था असणे गरजेचे असते. ज्या शेतमाल विक्रीव्यवस्थेत व्यापार विषयक पुरेशी माहिती, शेतमाल साठवणुकीच्या पुरेशा सोयी, स्वस्त व विपूल वाहतूक आणि दळणवळण सुविधा, मध्यस्थांची संख्या कमी, सुसंघटीत बाजारव्यवस्था अशा वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या शेतमाल विक्रीव्यवस्थेला आदर्श शेतमाल विक्रीव्यवस्था असे म्हणतात.' शेतमाल या संज्ञेत जमिनीशी निगडीत असलेल्या व्यवसायांचा समावेश होतो. त्यामुळे शेतीमधून धान्य, पिके, व्यापारी पिके,

फळे फुले, आणि भाजीपाला यांचे उत्पादन घेतले जाते.

२ कृषी बाजारपेठांची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

मानवाच्या अमर्याद गरजा व मर्यादित परंतु पर्यायी उपयोगाची साधने यांचा मेळ घालण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय. अर्थशास्त्र मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी लागणारी साधने ही दुर्मिळ व पर्यायी उपयोगाची असतात.

शेती करतांना शेतकऱ्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न असतो. तो करताना त्याचे अनेक संबंध निर्माण होतात. कृषी अर्थशास्त्राला यासंबंधाचा विचार करावा लागतो. कृषी अर्थशास्त्र केवळ शेती आणि अर्थशास्त्र यांच्याशी संबंधित शास्त्र राहीलेले नसून त्याचा संबंध इतर अनेक शास्त्रांशी येतो. शेतीच्या विकासाचा प्रश्न व ऐतिहासिक पार्श्वभूमी शेती लागवडीमधील अनेक समस्या, उपाय योजना, शेती करण्याचे प्रकार, तुलनात्मक उपयुक्तता, शेतीमधील आदानउत्पादन, विविध घटकांच्या प्रतिस्थापनाची शक्यता, खर्च आणि किंमतीचा विचार शेतीशी निगडीत आहे.

३ कृषी उत्पन्न बाजारपेठांचा अर्थ / व्याख्या :

सामान्यपणे बाजारपेठ या संज्ञेचा अर्थ खरेदी-विक्रीची जागा असा घेतला जातो. ग्राहक आणि विक्रेते समान किंमतीच्या हेतूने एकत्र येतात त्या जागेस बाजार असे संबोधले जाते. परंतु औद्योगिक वस्तूंचा बाजार आणि शेतमालाचा बाजार या मध्ये फरक आहे. औद्योगिक वस्तूंचे उत्पादन व पुरवठा यावर उत्पादकाचे नियंत्रण असते. परंतू शेतमालाचे उत्पादन व पुरवठा यावर शेतकऱ्यांचे नियंत्रण नसते. त्यामुळे असंघटीत शेतकरी किंमतीवर प्रभाव पाडू शकत नाही. परिणामी शेतमालाच्या विक्री व्यवस्थेचे स्वरूप लक्षात घेण्यासाठी शेतमालाचा उपभोक्ता आणि शेतमालाचा उत्पादक यांच्यातील मध्यस्थांची साखळी लक्षात घेणे आवश्यक आहे.

१) काही शेतमालाचा उपभोक्त्यांकडून थेट उपभोग घेतला जातो.

उदा. गहू, ज्वारी, बाजरी, तांदूळ, डाळी इ.

२) शेती क्षेत्रातील कच्चामाल खरेदी करणारा औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक यात फळे,

भाजीपाला, कापूस, ताग, तंबाखू, ऊस, तेलबिया, चहा, कॉफीसाठी वापरली जाणारी पाने इ.

३) शेती क्षेत्रातील कच्चामाल खरेदी करून त्यावर प्रक्रिया करून निर्यात केली जाते. उदा.चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, कच्चे रबर, कडधान्ये, फळे भाजीपाला, फळांचा गर, इ.

उत्पादक व उपभोक्ते यांना जोडणारा दुसरा महत्वाचा घटक मध्यस्थ होय. या मध्यस्थामार्फत शेतमाल गोळा करणे, शेतमालाची वाहतूक करणे, शेतमाल व्यवस्थित ठेवणे, शेतमालाची बाजारात विक्री करणे व शेतमाल अंतिम ग्राहकांपर्यत पोहचविणे हे कार्य मध्यस्थाशिवाय पार पडू शकत नाहीत.

शेतमालाचे उत्पादन घेतल्यानंतर तो शेतमाल वेगवेगळया ठिकाणी विकला जातो. काही शेतकरी आपला शेतमाल गावातील व्यापारी, सावकार, दलाल यांना विकतात. काही शेतकरी आपला शेतमाल आठवडी बाजारात विकतात. काही शेतकरी आपला शेतमाल कृषी उत्पन्न बाजारपेठांमार्फत विकतात. तर काही शेतकरी आपला शेतमाल सहकारी खरेदी-विक्री संस्थांमार्फत विकतात. या सर्व खरेदी-विक्रीमध्ये मध्यस्थ महत्वाची भूमिका पार पाडतात.

४ व्याख्या :

१) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कृषी सहकार व्यासपीठ तज्ञाच्या मते "शेतमाल काढणीस आल्यापासून ग्राहकास शेतमालाचा ताबा देईपर्यंतच्या बाबींचा समावेश असलेल्या क्रिया म्हणजेच कृषी बाजारपेठ होय.

२) पाश्चात्य अमेरिकन तज्ञ थॉमसन यांच्या मते "विपणनाच्या कार्याबरोबर कर्त्यांचाही तसेच प्रक्रिया केलेल्या उत्पादनाचा व त्यांच्या परिणामांचाही समावेश केला जातो."

३) अमेरिकन विपणन संघाच्या मते "उत्पादन ते उपभोग असा वस्तु आणि सेवांचा प्रवास प्रवाहित ठेवण्यासाठी कामी येणाऱ्या व्यापारी क्रिया म्हणजे विपणन होय.'

४) कान्हर्स, हयुजी आणि मिथेल यांच्या मते "स्थल, काल व मालकीच्या उपयोगितेच्या निर्मितीत अंतर्भुत असणाऱ्या सर्व क्रिया म्हणजे विपणन होय."

५) विल्यम स्टॅन्टन यांच्या मते: "विपणन म्हणजे अनेक क्रिया मिळून झालेली एक प्रणाली होय."

६) जॉन क्रिमन पाईल यांच्या मते : " विपणन ही व्यावसायिक कार्याची अवस्था आहे. या मार्फत वस्तु व सेवांचा विनिमय करून मानवी गरजा पूर्ण करता येतात."

५ कृषी बाजारपेठांचे स्वरुप :

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय शेतीचे स्वरुप मागासलेले होते. शेतीची उत्पादनक्षमता अत्यल्प होती. शेती परंपरागत पध्दतीने केली जात होती. शेती मधून स्वतःच्या कुंटुंबाचा चरितार्थ चालवता येईल एवढेच उत्पन्न मिळत होते. अर्थव्यवस्था ग्रामीण असल्यामुळे पैसा व व्यापाराला फारशे महत्व नव्हते. ब्रिटिश सरकारच्या काळात शेती क्षेत्रात अनेक प्रकारच्या सुधारणा घडून आल्या. व्यापारी पिकांना चालना मिळाली परंतु याचा फायदा मोठे शेतकरी व जमीनदार वर्गालाच झाला. लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांना फारसा फायदा झाला नाही. ब्रिटीश काळात भारतात जमीनदारी पध्दत असल्यामूळे कुळे, शेतमजूर व शेतकरी यांच्या कडून शेती करुन घेतली जात होती. परंतु त्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला दिला जात नव्हता. पतपुरवठ्याच्या सोयी उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांना सावकराकडे जाण्याशिवाय पर्याय नव्हता.

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ६५% लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येचे उदरनिर्वाहाचे व रोजगाराचे महत्वाचे साधन म्हणून शेतीकडे पाहिले जाते. शेती मधून मिळणाऱ्या उत्पन्नाला योग्य बाजारपेठ मिळाल्यास शेतकरी पर्यायाने भारताच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. या हेतुने भारतामध्ये प्रथम अकोला जिल्ह्यात कारंजा या ठिकाणी सन १८९६ मध्ये मार्केट कमिटीची स्थापना करण्यात आली. १९३९ च्या बॉम्बे अग्रीकलचरल प्रोड्युस मार्केट ॲक्टद्वारे काही नियम घालून दिले. त्यामध्ये

१) बाजारभावाचे मार्गदर्शन करणे.

२) खरेदीदार, दलाल, मापाडी यांच्यातील वाद मिटविणे.

३)	बाजारपेठ स्थापन करुन सरकारच्या नियंत्रणाखाली चालविणे.

४)	उघड लिलाव करणे.

५)	बाजारभावाची शेतकऱ्यांना माहिती देणे.

वरील नियमांचे पालन करण्यासाठी शासनाने वेळोवेळी समित्या स्थापन करुन बाजारात स्थिरता आणण्याचा प्रयत्न केला. सन १९५० मध्ये प्रो. दातवाला यांनी अशी शिफारस केली की, राज्यभरात नियंत्रित बाजाराचे जाळे असावे. सन १९५५ मध्ये एक कमिशन नेमले. कमिशनच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र सरकारने १९/०६/१९६३ मध्ये कायदा केला. तो महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम म्हणून समंत करण्यात आला. २५ मे १९६७ मध्ये तो महाराष्ट्रभर लागू करण्यात आला. या नियमाचे उद्देश पुढीलप्रमाणे

१)	शेतमालाला योग्य भाव मिळवून देणे.

२)	बाजारपेठांचा दर्जा सुधारणे.

३)	शेतकरी व ग्राहक यांचे हक्काचे रक्षण करुन त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करणे.

४)	नियंत्रित बाजारपेठ स्थापन करुन त्याचे नियंत्रण करणे.

भारतीय व्यवस्थेचा भक्कम पाया म्हणून शेतीकडे पाहिले जाते. जो देश कृषी समृध्दकरतो तो देश अन्नधान्याच्या बाबतीत इतर देशांवर अवलंबून रहात नाही. तो देश परकीय वर्चस्व झुगारुन लावतो. भारताने अणुस्फोट घडवून आणल्यानंतर अमेरिका, जपान, इंग्लंड, फ्रान्स या देशांनी भारतावर काही निर्बंध घातले. परंतू शेतीसमृध्दी असल्याने त्याचा भारतीय लोकांच्या जीवनावर काहीच परिणाम झाला नाही. कृषीव्यवस्था चांगली असल्यामुळे तो देश कोणत्याही संकटांना सामोरे जाऊ शकतो. कृषी मालाचे उत्पादन कमी जास्त झाल्यास त्याचे भाव स्थिर ठेवणे महत्वाचे असते. शेतमालाचे भाव योग्य ठेवण्यासाठी नियंत्रित बाजारपेठांची आवश्यकता असते. त्याद्वारे शेतकरी व ग्राहक यांच्या हिताचे रक्षण केले जाते.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे, १९६० रोजी करण्यात आली. सध्या महाराष्ट्रात २९५ मुख्य बाजार व ६०९ उपबाजार कार्यरत आहेत. शासनाने निरनिराळ्या कायद्याची अंमलबजावणी करुन

जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी नियंत्रित बाजारपेठा स्थापना करुन सावकार व जमीनदार अशा लोकांच्या तावडीतून शेतकऱ्यांची सुटका केलेली दिसून येते. शेतकऱ्याच्या मालाला योग्य किंमत मिळावी, त्यांचे परिश्रम, भांडवल, गुंतवणूक वाया जाऊ नये, व्यापारी दलाल मध्यस्थ यांच्याकडून पिळवणूक होऊ नये, या हेतूने महाराष्ट्रात 'कृषी उत्पन्न खरेदी-विक्री अधिनियम, १९६३ नुसार बाजारपेठांची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात प्रामुख्याने नियंत्रित व अनियंत्रित असे दोन प्रकारचे बाजार आढळून येतात.

शेतकऱ्यांच्या शेतमालाला बाजारपेठेत योग्य भाव मिळावा त्यांची मध्यस्थ, दलालांकडून पिळवणूक होऊ नये यासाठी शासन शेतकऱ्यांना विविध मार्गाने मदत करत असते. अलिकडील काळात महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडे राज्यातील बाजारपेठांच्या कामामध्ये समन्वय साधने, बाजारपेठांचा विकास व प्रसार, शेती निर्यात क्षेत्राची स्थापना, फलोत्पादन प्रशिक्षण केंद्र आणि प्रतवारी, संवेष्टन सुविधांची स्थापना करणे अशी कार्ये सोपवली आहेत. कृषी पणन मंडळामुळे बाजारपेठांमध्ये शेतमालाची उलाढाल वाढल्याचे दिसून येते. त्याचबरोबर शेतकऱ्यांना रोजच्या रोज बाजारभाव माहित व्हावेत, बाजारपेठांच्या कार्यात गती आणण्यासाठी बाजारपेठांचे संगणकीकरण करुन त्या संकेत स्थळाला जोडल्या आहेत. संगणकीकरणामुळे शेतकऱ्यांना दररोज बाजारपेठांमधील आवक व किंमत यासंबंधी माहिती मिळते.

अलिकडील काळात केंद्र सरकारने किरकोळ क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुक करण्याचा जो निर्णय घेतला (एफ.डी.आय.) त्या निर्णयाचे अनेकांनी स्वागत केले आहे. कारण या निर्णयामुळे फळे व भाजीपाला उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. पुरेशा शीतगृहांच्या सोयीअभावी मोठ्या प्रमाणात फळे व भाजीपाला नाश पावतात. अशा नाशवंत वस्तू साठवण्यासाठी शीतगृहे, शितकरणाची सोय असलेल्या व्हॅन अशा सोयी असाव्या लागतात. परंतु या सोयीअभावी फळे व भाजीपाला खराब होण्याचे प्रमाण मोठे आहे. किरकोळ क्षेत्रात थेट परकीय गुंतवणूक आल्यास फळे व भाजीपाला साठवणुकीसाठी आवश्यक त्या शितकरणाचे तंत्रज्ञान आणि सोयी-सुविधाही देशात येतील. त्यामुळे फळे व भाजीपाला खराब होण्याचे प्रमाण कमी होऊन

होणारा तोटा कमी होण्यास मदत होईल. ग्राहकांना चांगल्या दर्जाची फळे व भाजीपाला उपलब्ध होतील.

६ कृषी उत्पन्न बाजारपेठांची माहिती :

प्रस्तूत संशोधनात 'लातूर जिल्ह्यातील कृषी बाजारपेठांचा अभ्यास विशेष संदर्भ - फळे व भाजीपाला' या विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे. लातूर जिल्हा कृषीप्रधान व शैक्षणिकदृष्ट्या प्रगत जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील ७५ टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रावर उदरनिर्वाहासाठी अवलंबून आहे. जिल्हयातील लागवडी खालील क्षेत्रफळ ७४.५७ टक्के एवढे आहे. शेती ही मोसमी पावसावर अवलंबून आहे. एकूण क्षेत्रफळापैकी १६ टक्के क्षेत्रफळ सिंचनाखाली आहे.

उस्मानाबाद व बीड या दोन जिल्ह्याचे विभाजन होऊन १६ ऑगस्ट १९८२ रोजी लातूर हा नवीन जिल्हा निर्माण झाला. जिल्ह्याचा पश्चिम व मध्य भाग बालाघाट डोंगर रांगानी व्यापलेला आहे. जिल्ह्यातील मध्यभागी मांजरेचे खोरे तर दक्षिणेकडे तेरणा खोरे पसरलेले आहे. उत्तरेकडील प्रदेश सखल व सपाट आहे. हवामान उष्ण, सौम्य व कोरडे असून ७५ ते १०० सें. मी. पर्जन्यमान होते. जिल्ह्यातून मांजरा, तेरणा, तावरजा, धरणी, मन्याड, लेंडी या नद्या वाहतात. ज्वारी, बाजरी, गहू व कापूस या पिकांबरोबरच द्राक्ष, आंबा, डाळींब, चिकू, संत्रा, केळी या फळाबरोबर भाजीपाला यांचे उत्पादन करुन काही फळे व भाजीपाला यांची निर्यात देखील केली जाते. फळे व भाजीपाला टिकवण्यासाठी शीतगृहे उभारली आहेत. फळे व भाजीपाला यांच्या उत्पादनाकडे शेतकऱ्यांनी वळावे यासाठी 'लातूर जिल्हा आंबा, फळे व भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था ' स्थापन करुन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जाते. परिणामी या पिकाखालील क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. लातूर जिल्ह्यात लातूर, रेणापूर, अहमदपूर, जळकोट, चाकुर, शिरुर अनंतपाळ, औसा, देवणी, उदगीर, निलंगा व औरादशहाजानी अशा एकूण ११ बाजारपेठा कार्यरत आहेत. या ११ बाजारपेठांपैकी ७५ टक्के बाजारपेठा म्हणजेच ९ बाजारपेठांची अभ्यासासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये लातूर, रेणापूर, अहमदपूर, चाकुर, शिरुरअनंतपाळ, औसा, उदगीर, निलंगा व औरादशहाजानी या ९ बाजारपेठांचा अभ्यास करण्याज आला आहे." त्याचा तपशील तक्ता क्रमांक

०१ मध्ये दिला आहे.

तक्ता क्र. ०१

लातूर जिल्ह्यातील तालुकानिहाय कृषीबाजारपेठांची संख्या

अ.क्र.	**लातूर जिल्ह्यातील कृषी बाजारपेठा**	**बाजारपेठांची संख्या**
१	लातूर	०१
२	अहमदपूर	०१
३	निलंगा	०१
४	उदगीर	०१
५	चाकुर	०१
६	औरादशहाजानी	०१
७	रेणापूर	०१
८	औसा	०१
९	शिरुर अनंतपाळ	०१
	एकूण	**०९**

आधार - लातूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन २०२१-२२

७ कृषी उत्पन्न बाजार पेठांची व्याप्ती :

शेती क्षेत्र भारतीय अर्थ व्यवस्थेचा कणा म्हणून ओळखला जातो. शेतकरी रात्रंदिवस शेतात काबाडकष्ट करून शेतमाल पिकवतो. परंतु त्याच्या शेतमालाला योग्य किंमत मिळत नाही. त्यामुळे शेतमाल विक्रीचा प्रश्न गेल्या काही वर्षात नियोजनासंबंधीच्या प्रगत कार्यामुळे. तसेच शेतकऱ्यांनी आत्मसात केलेल्या नवीन तंत्रज्ञानांमुळे, हरितक्रांतीमुळे पुढे आला आहे. शेतमाल विक्रीच्या सदयस्थिती बरोबरच शेतीमालाची विक्री योग्य वाढ, विक्रेय उत्पादन, प्रत्यक्ष विक्रीची पध्दत यामध्ये सुधारणा करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ कसा मिळविता येईल याचा अभ्यास करावयाचा आहे. कृषीविपणनाची व्याप्ती खुप मोठी असून त्यात बाजारपेठांचे कार्य, मध्यस्थ, विपणनाची साखळी, सक्षम विक्री व्यवस्था, विपनावरील आवश्यक खर्च व काटकसर,

उत्पादन खर्च, शेतमालाच्या बाजार पेठेतील सोयी, खर्च वाहतूकीच्या सोयी, बाजारपेठातील पायाभूत सुविधा इत्यादी बाबींचा त्या मध्ये समावेश होतो.

त्या दृष्टीने शेतमालाच्या खरेदी-विक्रीतील गैरव्यवहारांना आळा घालणे. शेतकऱ्यांना दयावी लागणारी किरकोळ देणी कमी करणे शेतमालाला योग्य किंमत मिळण्याची हमी देणे या हेतूंनी नियंत्रित बाजारांची स्थापना करण्यात आली. सर्वप्रथम १८९७ मध्ये वऱ्हाड (विदर्भ) प्रांतात कापूस विक्रीसाठी नियंत्रित बाजाराची स्थापना करण्यात आली. रॉयल कमिशन ऑन ॲग्रीकलचरलच्या सुचनेनुसार १९३० च्या सुमारास नियंत्रित बाजार स्थापन करण्यास सुरूवात झाली. सध्या सर्व राज्यांनी नियंत्रित बाजार स्थापन करण्याचा कायदा पास केला आहे. भारतात १९५०-५१ मध्ये नियंत्रित बाजारांची संख्या २६५ होती. नियंत्रित बाजाराची संख्या आज ७५०० पर्यंत वाढलेली आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. राज्यकारभाराच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने निरनिराळ्या कायदयाची अंमलबजावणी करून प्रत्येक जिल्हयाच्या व तालुक्याच्या ठिकाणी एक नियंत्रित बाजार स्थापन करून सावकार व जमीनदार अशा लोकांच्या तावडीतून शेतकऱ्यांची सुटका केलेली दिसून येते.

प्रस्तुत संशोधनामध्ये **"महाराष्ट्रातील कृषी बाजारपेठेअंतर्गत फळे व भाजीपाला बाजापेठांचा अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा (२०१४-१५ ते २०२४-२५)"**या विषयाचा अभ्यास करण्यात येणार आहे. सदर संशोधनाची व्याप्ती लातूर जिल्हयापुरती मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधनात लातूर जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजारपेठातील फळे व भाजीपाला खरेदी-विक्री व्यवहारांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

८ कृषी उत्पन्न बाजारपेठेची वैशिष्टये :

१) बाजारासंबंधी पुरेशी माहिती :

कृषी उत्पन्न बाजारपेठांमध्ये शेतकऱ्यांना विविध घटकांची पुर्ण व नवीन माहिती त्वरीत मिळण्याची व्यवस्था हवी, विविध उत्पादनांची आवक, किमंती मधील बदल, मागणीचे अंदाज, निर्यातीची शक्यता इ. बाबींची शेतकऱ्यांना माहिती मिळाल्यास त्यांचा मोठ्या प्रमाणावर फायदा

होऊन मध्यस्थ व दलालांनाकडून होणारी फसवणूक कमी होण्यास मदत होईल.

२) बाजार समिती स्थापन करणे :

नियंत्रित बाजारपेठ स्थापन करण्यासाठी शासन 'मार्केट यार्डाची' सोय उपलब्ध करून देते. शेतीमालाच्या 'आवक' वरून त्या आकारामध्ये बांधले जाते. मोठ्या शहरांमध्ये शेतीमालाच्या प्रकारानूसार एकाच मार्केट यार्डमध्ये वेगवेगळे विभाग केले जातात. उदा. वाशी (मुंबई), गुलटेकडी (पुणे) येथे शेतीमाल विक्रीचे अन्नधान्ये, भाजीपाला फळे, फुले मासे, मांस, कांदा, बटाटा, लसूण, मिरची असे शेतीमाल विक्रीसाठी वेगवेगळे भाग आहेत. त्या ठिकाणी वर्षाकाठी ठराविक भाडे आकारून आडतदाराला गाळे दिले जातात. त्यामध्ये शेतकऱ्यांचा शेतमाल ठेवला जातो व जास्त किंमत देणाऱ्या खरेदीदारास तो विकला जातो. यावर बाजारपेठेचे नियत्रण असते.

३) बाजारपेठेंमध्ये विविध सुविधा पुरविणे :

बाजारपेठांमध्ये व्यापाऱ्यांसाठी गाळे दिले जातात. व्यापारी ठराविक शुल्क भरून कमिशन एजंट म्हणून काम करतो. शेतकऱ्यांना बाजारपेठामध्ये येणे परवडणारे नसल्याने कमिशन एजंट मार्फत शेतमालाची विक्री केली जाते. शेतकऱ्यांनी शेतमाल प्रतवारी करून पाठवावा असे बाजारपेठांचे संकेत असतात. परंतू शेतकरी शेतमालाची प्रतवारी न करता तशाच पाठवतात उदा. अन्नधान्ये न निवडता, न चाळता बाजारपेठेमध्ये पाठविले जाते. शेतमालाची प्रतवारी करण्यासाठी बाजारपेठांमध्ये विविध सुविधा पुरविल्या जातात.

४) ठोक विक्रेते यांनी करावयाची खरेदी :

व्यापाऱ्यांना बाजारपेठांमध्ये हजर राहूनच शेतमाल खरेदी करता येतो. त्यांना शेतकऱ्यांकडून थेट शेतमाल खरेदी करता येत नाही.

५) शेतीमालाचा उघड लिलाव :

शेतकऱ्यांच्या शेतीमालाचा उघड पध्दतीने लिलाव केला जातो. एजंट शेतीमालाची किंमत मोठ्याने पुकारतो जो व्यापारी जास्त किंमत देईल त्याला तो शेतमाल विकला जातो.

६) शेतीमालाची संपुर्ण किंमत मिळण्याची हमी :

शेतकऱ्यांच्या शेतीमालाचा उघड पध्दतीने लिलाव झाल्यानंतर कमिशन व इतर खर्च वजा करून राहिलेली रक्कम शेतकऱ्यांना रोख स्वरूपात दिली जाते.

७) कोणत्याही बाजारपेठांमध्ये शेतीमाल पाठविता येतो :

शेतकऱ्यांचा शेतीमाल एजंटमार्फत राज्यातील कोणत्याही बाजार पेठांमध्ये पाठविता येतो महाराष्ट्रातील फळे व भाजीपाला दिल्ली, अहमदाबाद, कोलकत्ता, बंगलोर, अशा विविध बाजापेठांमध्ये पाठविला जातो. काश्मीरची सफरचंदे, कर्नाटकचा तोतापुरी आंबा, पुणे, नागपूर अशा बाजारपेठांमध्ये शेतकऱ्यांशिवाय विकला जातो.

८) बाजार समाचार :

बाजारपेठांमध्ये फळे व भाजीपाला यांची आवक किती, कोणत्या भागातून आवक जास्त, कोणत्या भागातून आवक कमी, किती दर अशी सर्व माहिती आकाशवाणी आणि वर्तमान पत्रामध्ये व वेबसाईटवर प्रसारीत केली जाते. याचा शेतकरी व व्यापाऱ्यांना फायदा होतो.

९ कृषी उत्पन्न बाजारपेठांची रचना/संघटन :

शेतमाल खरेदी-विक्रीशी संबंधीत बाजारपेठा हा विषय राज्यांच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे या संदर्भातील कायदे राज्य सरकारांनी केले आहेत. महाराष्ट्रात बॉम्बे ॲग्रीकल्चरल प्रोड्युस ॲक्ट १९३९ मध्ये करण्यात आला.

शेतकऱ्यांनी बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी आणलेल्या शेतमालावरील शुल्क, परवाना शुल्क, जागेचे भाडे, शेतऱ्यांना आवश्यक असलेल्या वस्तूंच्या विक्रीपासून येणारे उत्पन्न इ.मार्गांनी बाजारपेठांना उत्पन्न मिळते. बाजार पेठांचा कार्यालयीन व दैनंदिन खर्च या उत्पन्नातून केला जातो. उत्पन्नाचा काही भाग शेतकऱ्यांसाठी विश्रांतीगृहे बांधणे, जनावरांसाठी निवाऱ्याची सोय, पिण्याच्या पाण्याची सोय, रानटी जनावरे, मोकाट जनावरे यांच्या पासून शेतमालाची नासधूस होऊ नये यासाठी बाजार पेठेला कंपाऊंड वाल बांधणे, बाजारपेठांतर्गत रस्ते, दिवाबत्ती व स्वच्छता यासाठी खर्च करण्यात येतो. बाजारपेठांमध्ये या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यशासनाकडून

बाजारसमितीला कर्ज मिळू शकते त्यासाठी बाजारसमितीचा सभापती राज्यशासन आणि बाजारसमिती यांच्यातील दुवा म्हणून कार्य करतो बाजार समितीचा चिटणीस पुर्णवेळ पगारी नोकर म्हणून काम करतो. बाजार समितीच्या बैठका बोलविणे, बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची अमलबजावणी करणे, शेतमालाची आवक साठे, किंमती इ.बद्दलची माहिती गोळा करणे, वजनमापाची तपासणी करणे. इ.सारखी कामे चिटणीसाला करावी लागतात.

१० कृषी उत्पन्न बाजारपेठांचे कार्य :

१) बाजारपेठेतील शेतमालाच्या खरेदी-विक्री बाबत पध्दत व नियम निश्चित करणे. शेतकऱ्यांना बाजारपेठेमध्ये दयावी लागणारी देणी निश्चित करून त्यावर नियंत्रण ठेवणे.

२) बाजारपेठेत प्रमाणीत वजन मापेच वापरली जातात की नाही हे पाहणे व शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही याची काळजी घेणे.

३) एकाच व्यक्तीकडून खरेदीदार आणि विक्रेते या दोघांचे प्रतिनिधीत्व केले जाणार नाही आणि योग्य प्रकारे व्यवहार केले जातील याकडे लक्ष देणे.

४) शेतकरी आणि व्यापारी तसेच दलाल यांच्या मध्ये वाद निर्माण झाल्यास मध्यस्थी करून तो मिटवणे .

५) वजन करणारे आणि दलालांना परवाना देणे.

६) कायदयाविरूध्द वर्तन करणाऱ्यांना शिक्षा देणे.

११ कृषी उत्पन्न बाजारपेठांच्या कार्यातील अडचणी / समस्या :

१) गैर प्रकारांचे अस्तित्व :

अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीच्या मते नियमित बाजारपेठांमुळे शेतकऱ्यांच्या शेतमाल खरेदी-विक्री मधील समस्या काही प्रमाणात कमी झाल्या असल्या तरी अजूनही काही बाजारपेठांमध्ये बऱ्याच अडचणी असल्याचे पहायला मिळते.

२) बाजारपेठां बाहेरील गैरप्रकार :

अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीच्या मते शेतमालाचे उत्पादन करणारे

शेतकरी यांना शेतमालाची खरेदी करणारे व्यापारी शेतकऱ्यांना अडचणीच्या वेळी पतपुरवठा करत असतात. त्यामुळे शेतकरी व्यापाऱ्यांच्या विरोधात भूमिका घेत नाहीत.

३) इतर संघटनांचे वर्चस्व :

राष्ट्रीय कृषी आयोगाच्या मते अनेक शेतकरी शेतमालाची खरेदी-विक्री बाजारपेठांच्या बाहेरच पुर्ण करतात. त्याच प्रमाणे काही नियमित बाजार पेठांच्या जागा इतर संघटनांच्या मालकीच्या असतात.

४) अपुऱ्या सुविधा :

काही बाजारपेठांमध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, खरेदी-विक्री विषयक सुविधा अपुऱ्या असल्याचे आढळले आहे. त्यामुळे बाजारपेठांना आपल्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडता येत नाहीत.

१२ प्रशासकीय यंत्रणेतील उणिवा :

राष्ट्रीय कृषी आयोगाच्या मते कृषी बाजार पेठांमध्ये शेतमालाच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारावर देखरेख ठेवण्यासाठी प्रभावी अशी प्रशासकीय यंत्रणा नसल्यामुळे कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे अवघड होते.

१३ बिगर उत्पादक सभापती :

अनेक कृषी उत्पन्नबाजारपेठांचे सभापती शेतमाल उत्पादक शेतकरी नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी विशेष असे प्रयत्न केले जात नाहीत. व्यापारी व मध्यस्थ यांच्या हिताचे निर्णय घेतले जातात.

१४ संशोधन आराखडा :

१ अभ्यास विषयाची निवड :

लातूर जिल्ह्यामध्ये फळे व भाजीपाला यांचे बऱ्यापैकी उत्पन्न घेतले जाते. परंतू अशा फळे व भाजीपाला उत्पादकांना घाऊक व किरकोळ व्यापारी योग्य दर देत नसल्यामुळे शेतकऱ्यांची पिळवणुक होते. अशा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्यासाठी कृषी बाजारपेठा स्थापन

करण्यात आल्या. अशा बाजारपेठांच्या माध्यमातून फळे व भाजीपाल्यांची खरेदी-विक्री केली जाते. त्याचा अभ्यास करण्यासाठी **"महाराष्ट्रातील कृषी बाजारपेठेअंतर्गत फळे व भाजीपाला बाजापेठांचा अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा (२०१४-१५ ते २०२४-२५)"** या विषयाची निवड करण्यात आली.

२ अभ्यास विषयाचे महत्व :

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्य साधारण असे महत्व आहे. स्वातंत्र्यानंतर शेतीच्या विकासाचे सर्वांगीण प्रयत्न करण्यात आले. शेतीतले दोष दूर करण्यासाठी संस्थात्मक व संघटनात्मक सुधारणांची सुरूवात झाली. शेतमालाच्या बाजार पेठांमध्ये सुधारणा करण्यासाठी नियंत्रित बाजारपेठांची संख्या वाढविण्यात आली. नियंत्रित बाजारपेठांची संख्या वाढवण्या पाठीमागचा मुख्य हेतू म्हणजे व्यापारी, आडते, दलाल यांच्याकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबविणे व शेत मालाच्या किंमती उघड लिलाव पध्दतीने ठरविणे हे होते. आर्थिकदृष्ट्या पाहिल्यास राष्ट्रीय उत्पन्नाच्या जवळ जवळ २५ टक्के उत्पन्न शेती क्षेत्रातून मिळते. प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे ६९ टक्के लोकसंख्या शेतीवर आवलंबून आहे. भूमी, श्रम, भांडवल लाभदायक होण्यासाठी शेतमालाला योग्य भाव मिळणे आवश्यक आहे. शेतीच्या विकासाला सर्वात मोठी चालना शेतमाल विक्रीतून मिळत असते. उद्योगांचा विचार केल्यास कारखानदारीसाठी लागणारा कच्चामाल शेतीतून मिळत असतो. उद्योगासाठी लागणारे वातावरण निर्माण करण्यात मोठा हिस्सा लोकांच्या खरेदी शक्तीवर अवलंबून असतो. त्याचा एकूण अर्थकारणावर परिणाम होत असतो. सहाजीकच भारतासारख्या विकसनशील देशात विकासाचे माध्यम म्हणून शेती व्यवसायाचा उपयोग होऊ शकतो. एकंदरीत अन्नधान्याचा पुरवठा, राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा, निर्यातीतील वाटा, रोजगार निर्मिर्ती भांडवल निर्मिती, वस्त्रपुरवठा, आरोग्यासाठी औषधी उपयोग, शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा इ. चा समावेश होतो. कृषी क्षेत्राचे हे महत्व टिकवण्यासाठी शेतमालाच्या अंतिम विक्रीतून प्रत्येक रूपयातून शेतकऱ्याच्या वाटयास येणारा भाग तो कसा वाढवता येईल यासाठी शासनाची जबाबदारी, शासनाचे कृषि विषयक धोरण, देशातील बाजारपेठांविषयी नियमन, त्यात आवश्यक त्या वेळी सुधारणा यात फळे व

भाजीपाला यांची निर्यात वाढवून भारतीय शेतमालाचा नावलौकिक वाढवणे व तो टिकविण्यासाठी उचलावयाची आवश्यक ती पावले त्यासाठी आवश्यक ते माहिती तंत्रज्ञान बाजारभावाची हमी व सक्षम अशा विपणनव्यवस्थेची कास धरावी लागेल. शेतजमिनीचे हे महत्व लक्षात घेऊन लातूर जिल्हयातील फळे व भाजीपाला उत्पादक शेतक?यांच्या मालाला योग्य दर मिळवून देण्यासाठी कृषी बाजारपेठांची कामगिरी महत्वपुर्ण ठरणार आहे . त्यामुळे संशोधन विषयाचे महत्व वाढणार आहे.

३ अभ्यास विषयाची उद्दिष्टे :

संशोधन विषयाची काही उद्दिष्टे निश्‍चित करण्यात आली आहेत

१) लातूर जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजारपेठेतील फळे आणि भाजीपाला खरेदी-विक्री व्यवहारांचा अभ्यास करणे.

२) लातूर जिल्हयातीलकृषी उत्पन्न बाजारपेठाकडून आडत्यांना पुरविण्यात येणा-या सेवा सुविधांची माहिती घेणे.

३) फळे आणि भाजीपाला विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधांचा अभ्यास करणे.

४) लातूर जिल्हयातील कृषीउत्पन्न बाजार पेठामध्ये शेतकऱ्यांना फळे व भाजीपाला विक्री करतांना येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करणे.

५) लातूर जिल्हयातील कृषीउत्पन्न बाजारपेठांच्या कार्यप्रणालीचा अभ्यास करणे.

४ अभ्यास विषयाची गृहीतके :

संशोधनाची दिशा निश्‍चित होण्यासाठी संशोधन समस्या एक संभाव्य उत्तर शोधले जाते. समस्याचे असे संभाव्य उत्तर आपणास अध्ययन विषयाच्या एखाद्या पैलूमूळे सूचित होते. त्याचे विधानामध्ये रुपांतर केले जाते. त्यास गृहीतके म्हणतात. ही गृहीतकृत्ये सैध्दांतिक दृष्टया स्पष्ट, सोपी, विशिष्ट समस्येच्या बाबतीत निरीक्षण करण्याच्या दृष्टीने योग्य असते. शिवाय संशोधनातून तांत्रिक दृष्टीने सुसंगत असे निष्कर्ष काढले जातात. त्याचा निर्णय व धोरण आखण्याच्या दृष्टीने

उपयोग होतो.

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील परिकल्पना कल्पिलेल्या आहेत.

१) कृषी उत्पन्न बाजारपेठमार्फत झालेल्या फळे व भाजीपाला खरेदी-विक्री व्यवहारात सातत्य आढळून येत नाही.

२) कृषी उत्पन्न बाजारपेठांकडून अडत्यांना मिळणाऱ्या सेवा सुविधांबाबत उणीवा आहेत.

३) कृषी उत्पन्न बाजारपेठांकडून शेतक-यांना मिळणाऱ्या सेवा सुविधांमध्ये उणिवा आहेत.

४) फळे आणि भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना बाजारपेठामध्ये विक्री करतांना अडचणी येतात.

५) कृषी उत्पन्न बाजारपेठांमध्ये अंतर्गत कार्यप्रणाली उपयुक्त ठरते.

५ अभ्यास विषयाची व्याप्ती :

प्रस्तूत संशोधनामध्ये **"महाराष्ट्रातील कृषी बाजारपेठेअंतर्गत फळे व भाजीपाला बाजापेठांचा अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा (२०१४-१५ ते २०२४-२५)"** या विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे. सदर संशोधनाची व्याप्ती ही फक्त लातुर जिल्ह्यापुरती मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधन लातुर जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजारपेठातील फळे व भाजीपाला खरेदी विक्री व्यवहारांवर आधारलेले आहे.

६ अभ्यास विषयाची साधनसामुग्री :

प्रस्तूत संशोधनामध्ये लातूर जिल्ह्यातील कृषी बाजारपेठांचा अभ्यास विशेष संदर्भ, फळे व भाजीपाला या विषयाचा अभ्यास करण्यासाठी विविध मार्गांनी तथ्य संकलन करण्यात येणार आहे. अभ्यासासाठी आवश्यक असलेली माहिती गोळा करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेण्यात येणार आहे.

१ प्राथमिक साधन सामग्री :

तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक साधन सामग्रीचा उपयोग केला जाणार आहे. त्यामध्ये अनुसूची, प्रश्नावली, मुलाखत, प्रत्यक्ष निरीक्षण इत्यादिचा अवलंब केला जाणार आहे. लातूर

जिल्ह्यात एकूण दहा तालुके असून ११ कृषीबाजारपेठा कार्यरत आहेत. या बाजारपेठांपैकी ७५ टक्के कृषी बाजारपेठांची अभ्यासासाठी निवड करण्याज आली आहे. त्या प्रत्येक बाजारपेठातील प्रत्येकी १३ फळे व भाजीपाला उत्पादक शेतकरी व १३ फळे व भाजीपाला खरेदी करणारे आडते असे एकूण १३+१३=२६ खरेदी-विक्री करणारे नऊ तालुक्यातील ९ x २६ = २३४ फळे व भाजीपाला उत्पादकांची व फळे व भाजीपाला खरेदीदारांची यादृच्छिक नमुना निवडीतील सोयीस्कर पध्दतीनुसार निवड करण्यात येणार आहे.

२ दुय्यम साधन सामग्री :

दुय्यम साधनसामग्रीमध्ये लातुर जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजारपेठांचे वार्षिक अहवाल, संदर्भ ग्रंथ, वर्तमानत्रातील लेख, विविध मासिके, शासनाचे प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, इंटरनेट, महाराष्ट्र सर्व्हेक्षण अहवाल इत्यादीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करण्यात येणार आहे.

१५ प्रकरण रचना :

प्रस्तुत अभ्यासाठी एकूण सात प्रकरणे निश्चित केली आहेत

प्रकरण पहिले : प्रास्ताविक व संशोधन पध्दती :

कृषी बाजार पेठांची सर्वसामान्य माहिती आणि संशोधन पध्दती : यामध्ये प्राथमिक, दुय्यम साधन सामग्रीच्या साह्याने तथ्य संकलन करुन्. विश्लेषण तंत्र व सांख्यिकीय तंत्राचा अवलंब करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तुत प्रकरणात कृषी बाजारपेठाला अनुसरुन व्यक्त केलेल्या मतांचा अभ्यास करण्यात येणार आहे. कारण संशोधन विषयाला अनुसरून असे विचार उपयुक्त ठरणारे असतात.

प्रकरण तिसरे : लातुर जिल्ह्याची पाश्वभूमी :

प्रस्तूत प्रकरणात लातूर जिल्ह्याचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, लोकसंख्या, भूमी, पीकरचना, जलसिंचन, शिक्षण, आरोग्य, वाहतूक व दळणवळण, बँकींग, व्यापार इत्यादी घटकांचा विचार करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : शेतमालाच्या विक्री व्यवस्थेचा अभ्यासः

शेतमाल विक्रीच्या पध्दती, महत्त्व, आदर्श शेतमाल विक्रीव्यवस्था, भारतातील शेतमाल विक्री व्यवस्था, अनियंत्रित बाजार, नियंत्रित बाजार, बाजार समितीची रचना, कार्ये, प्रगती, व्यवस्थापन व संघटन, बाजारासंबंधी नवीन कायदा इ. संबंधी अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : लातूर जिल्हयाच्या विकासामध्ये कृषी क्षेत्राचे योगदान

लातूर जिल्ह्याच्या विकासातील कृषी मालाचे योगदान, क्षेत्रफळ, लोकसंख्या, नद्या, शेती हंगाम, वहीत क्षेत्रफळ, जलसिंचन, हेक्टरी एकूण उत्पादन, कृषी अवजारे, दुग्धव्यवसाय, साखर उद्योग, बाजारपेठा विकास व विस्तार इत्यादी विषयाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ६ वे : लातूर जिल्ह्यातील निवडक फळे व भाजीपाला उत्पादक व खरेदीदारांची स्थिती

प्रस्तूत प्रकरणाची तीन भागात विभागणी करण्यात येणार आहे. त्यामध्ये

अ) लातूर जिल्हयातील फळे व भाजीपाला उत्पादन

ब) लातूर जिल्हयातील फळे व भाजीपाला उत्पादकांची स्थिती

क) लातूर जिल्हयातील निवडक फळे व भाजीपाला खरेदीदारांची स्थिती

प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारशी

एक ते सहा प्रकरणावरुन काही निष्कर्ष व शिफारशी करण्यात येणार आहेत.

१.१०. अभ्यासाच्या मर्यादा :

संशोधन विषयाच्या अभ्यासातून अधिक स्पष्टता व अचूकता आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तरी परंतू अभ्यासावर काही मर्यादा पडतात.

प्रश्नावली व मुलाखतीद्वारे जी माहिती गोळा केली जाणार आहे. त्यामध्ये अचूकता आणली जाईल परंतू फळे व भाजीपाला विक्री करणारे शेतकरी व खरेदी करणारे आडते यांनी दिलेली माहिती बिनचूक असेलच असे नाही.

संशोधन विषयाच्या अभ्यासातून काढलेले निष्कर्ष लातूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित असतील.

संशोधन विषयाला अनुसरुन काढलेले निष्कर्ष व केलेल्या शिफारशी जशाच्या तशा अन्य जिल्ह्यातील फळे व भाजीपाला खरेदीदार व विक्रेते यांना लागू पडतीलच असे नाही.

संदर्भ सूची

१) निकम तानाजीराव., 'कृषीव्यवस्थापन व कृषीविपणन', अजिंक्यतारा पब्लिकेशन्स, मुंबई - ८१,२००१.

२) जाधवर आर. डी, आघाव आर. जी., गिते टी. जी, खुरुद बी. एस. 'भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास', अथर्व प्रकाशन, पूणे २००६.

३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ., 'कृषि व्यवसाय व्यवस्थापनाची मुलतत्वे आणि कार्यपध्दती,' प्रकाशक वडनेरे राजेंद्र, प्रभारी कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक २००१.

४) रायखेलकर / दामजी, 'भारतीय अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, २००३.

५) देसाई स. श्री मु व सौ. भालेराव निर्मल, 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन, पुणे, २००६.

६) कृषीदर्शनी सामान्य माहिती महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी २००९.

७) बागाईतदार अनंत, 'शेतकरी व ग्राहकाला फायदा', सकाळ न्युज नेटवर्क २३ सप्टेंबर २०१२.

८) सोवनी स.वि. 'योजना मासिके', महाराष्ट्राची फलोत्पादन निर्यात क्षमता आणि मुक्त व्यापार निती, २००३.

९) Datt Sudharam- Indian Economy Chand & Chand Company Ltd. New Delhi, २०१०.

१०) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ., 'कृषि व्यवसाय व्यवस्थापनाची मुलतत्वे आणि कार्यपध्दती,' प्रकाशक वडनेरे राजेंद्र, प्रभारी कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र

मुक्त विद्यापीठ, नाशिक २००१.

११) शेलकर अभया, 'महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (नियमन) अधिनियमन १९६३', नाशिक लॉ हाऊस, औरंगाबाद, २००५.

१२) कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा वार्षिक अहवाल २०१० ते २०२२.

१३) लातूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर जिल्हा, २०२१-२२.

१४) पंडीत शांता व पाटील लीला, 'कृषी अर्थशास्त्राची मूलतत्वे', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मितीमंडळ विधी महाविद्यालय परिसर, म. गांधी मार्ग नागपूर, १९८६.

१५) कऱ्हाडे बी.एम., 'शास्त्रीय संशोधन पध्दती', पिंपळापुरे ॲड कं. पब्लिशर्स, नागपूर, २००७.

१६) डॉ. पु. ल. भांडारकर, सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर (१९८७)

१७) प्रा. डॉ. ज एफ. पाटील, प्रा. डॉ. के. जी. पठाण, प्राचार्य पी. जे. ताम्हणकर, प्रा. डॉ. एस. बी. यादव, (२०१२) अर्थशास्त्रीय संशोधन पध्दतीची तोंडओळख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३०

१९) डॉ. प्रदीप आगलावे संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपूर (२०००)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पी. टी. पवार

वाणिज्य विभाग,

शिवाजी महाविद्यालय,

रेणापूर, ता. रेणापूर, जि. लातूर

संशोधक

नम्रता संजय वाघमारे